दैनिक
# वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
vadalvartanews@gmail.com संपादक : अजय भांगे https://epaper.vadalvarta.com
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी • शुक्रवार दि.१६ जानेवारी २०२६ • 9422660077 • आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ • वर्ष ३ रे • अंक १४३ • पाने ४ • किंमत ४ रुपये
Beed (Mahmar) Daily Marathi • Friday 16 January 2026 • 9422660077 • RNI-MAHMAR / 2023 / 87555 • Year - 3rd • Issue 143 • Pages 4 • Rate 4 Rs

## आरोपी येरवडा जेलमध्ये, इकडे केंद्रावर मतदान!

**मुंबई**–राज्यातील विविध महानगरपालिकांच्या निवडणुकीत मतदानाच्या दिवशी अनेक धक्कादायक प्रकार उघडकीस आले आहेत. मतदारांना पैशांचे वाटप, बोगस मतदान आणि बोटावरील शाई पुसून दुसऱ्यांदा मतदान करण्यासारख्या गैरप्रकारांनी निवडणूक प्रक्रियेला गालबोट लावले आहे. यात सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, पुण्यातील प्रभाग क्रमांक २४ मध्ये येरवाडा तुरुंगात असलेल्या एका आरोपीच्या नावे चक्क कुणीतरी मतदान केल्याचा प्रकार समोर आला आहे. आरोपी प्रत्यक्ष तुरुंगात असतानाही त्याचे मतदान केंद्रावर मतदान झाल्याचे समोर आले आहे. यामुळे एकच खळबळ उडाली आहे.पुण्यातील प्रभाग क्रमांक २४ मधील सरस्वती मंदिर या मतदान केंद्रांवर बोगस मतदान झाल्याचे समोर आले आहे. जो व्यक्ती येरवडा जेलमध्ये आहे, त्याच्या नावावर सुद्धा मतदान करण्यात आले आहे. याबाबत जे उमेदवार आहेत तसेच कार्यकर्ते आहेत, त्यांच्याकडून निवडणूक अधिकाऱ्यांना विचारणा करण्यात आली. मात्र, आयोगाकडून कुठलेही उत्तर मिळाले नाही. त्यामुळे कार्यकर्त्यांनी संताप व्यक्त केला आहे.

# परप्रांतीयांना मारणे हा मराठी माणसांचा विकास नाही-मुख्यमंत्र्यांचा ठाकरे बंधूंना टोला

## मुंबईत महायुतीचा विजय निश्चित असल्याचा दावा

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी मुंबईत महायुतीचा विजय निश्चित असल्याचा पुनरुच्चार केला. महापालिका निवडणुकीच्या निकालानंतर महाराष्ट्र हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याच मागे उभा असल्याचे अधोरेखित होईल. विशेषतः भाजप सर्वात मोठा पक्ष ठरेल, महायुतीच येथे राज्य करेल व मोदींच्या नेतृत्वात मिळालेल्या या विजयातून महाराष्ट्र कुणासोबत आहे हे ही स्पष्ट होईल, असे ते म्हणालेत. यावेळी त्यांनी परप्रांतीयाना मारहाण करणे म्हणजे मराठी माणसांचा विकास नसल्याचा टोलाही ठाकरे बंधूंना हाणला.वृत्तसंस्थेशी संवाद साधताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ठाकरे बंधूंवर सडकून टीका केली. ते म्हणाले, विरोधकांनी (ठाकरे बंधू) मराठी विरुद्ध अमराठी अशी निवडणूक करण्याचा खूप प्रयत्न केला. पण मराठी माणूस एवढा संकुचित नाही. महाराष्ट्रात आमची प्रादेशिक अस्मिता आहे. मराठी आमची भाषा आहे. त्या भाषेचा आम्हाला अभिमान आहे. त्या भाषेचा विकास व कल्याण झाले पाहिजे. मराठी माणूस हा महाराष्ट्रात सुरक्षित असला पाहिजे. त्याचा विकास झाला पाहिजे. यावर दुमत असता कामा नये.पण मराठी माणसाचा विकास म्हणजे काय? मराठी माणसावर मागील २५ वर्षांत मुंबईतून पलायन करण्याची वेळ आली. आणि तुम्ही तिकडे केवळ वल्गना केल्या, हा मराठी माणसाचा विकास नाही. एखाद्या परप्रांतीय ऑटो चालकाला २ थापडा मारणे हा ही मराठी माणसाचा विकास नाही.**



**मुंबई । प्रतिनिधी**

ते म्हणाले, आम्ही ८० हजार मराठी माणसांना बीडीडी चाळीत हक्काचे घर देऊन दाखवले. अभ्यूदय नगर असेल, पत्राचाळ असेल, विशाल सह्याद्री असेल, मोतीलाल नगर आदी भागातील मराठी माणूस कदाचित वसई-विरारपेक्षा जास्त लांब राहण्यासाठी गेला असता. त्याला त्याच ठिकाणी घरे देण्याचे काम आम्ही केले. हे मराठी माणसांसाठी केलेले काम आहे. त्यामुळे आज या एकाच कारणाने मराठी माणूसही विरोधकांसोबत नाही व अमराठीही त्यांच्यासोबत नाही. मराठी माणसाला ग्रहित धरून त्यांनी केलेला प्रयत्न पूर्णतः अपयशी ठरला आहे.देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी तामिळनाडूचे भाजप नेते अन्नामलाई यांच्या मुंबईवरील विधानावरून निर्माण झालेल्या वादावरही भाष्य केले. या प्रकरणी त्यांनी अन्नामलाईंचे स्पष्टपणे समर्थन केले. ते म्हणाले, अन्नामलाई हे काही राष्ट्रीय नेते नाहीत. ते बिचारे त्या तामिळनाडूचे नेते आहेत. येथील तामिळ लोकांनी बोलावले म्हणून ते आले. अनेकदा आपल्याही तोंडी मद्रास येते, मद्रासी येते. आता चेन्नई म्हणायला पाहिजे. आता मद्रासी कुणीच नाही. पण आपण बोलतो ना बोलता - बोलता. कारण जुनी सवय आहे.आपला काही त्यांचा अपमान करण्याचा हेतू नसतो. त्यामुळे अन्नामलाई यांनी बोलता - बोलता बॉम्बे म्हटले तर त्याचा अर्थ त्यांनी मुंबईचा अपमान केला किंवा ते मुंबईच्या विरोधात आहेत असा नाही. कोणत्याही गोष्टीचे भांडवल करायचे व त्यानंतर ज्या शब्दांत ते अन्नामलाईला बोलले ते पाहता तो तामिळ लोकांचा अपमान ठरत नाही का? या देशात मराठींनी तमिळांचा अपमान करायचा व हिंदींनी तेलुगुंचा करायचा, अशा पद्धतीने आपल्याला देश चालवायचा आहे का? आपल्या स्वभाषेचा अभिमान आम्हाला छत्रपती शिवाजी महाराजांनी शिकवला. त्याचवेळी इतर भारतीय भाषांचा सन्मानही आम्हाला शिवाजी महाराजांनीच शिकवला, असे ते म्हणाले.

### ठाकरेंसोबत युतीची कोणतीही शक्यता नाही

**निवडणुकीनंतर भाजप उद्धव ठाकरेंशी युती करणार का? असा प्रश्न यावेळी वृत्तसंस्थेने फडणवीसांना विचारला. त्यावर त्यांनी आमहाला कुणाशीही युती करण्याची गरज भासणार नाही असे ठणकावून सांगितले. राजकीय संबंध प्रस्थापित होण्याचे कोणतेही कारण मला दिसत नाही. वैयक्तिक पातळीवर ते आमचे काही शत्रू नाहीत. आम्ही एकत्र बसून चहाही पिऊ शकतो. त्याला कोणतीही अडचण नाही.**

## ग्वालियर घटनेचा तीव्र निषेध; ऑल इंडिया पँथर सेनेचे रावेर तहसीलदार व पोलिस निरीक्षकांना निवेदन

दैनिक वादळ वार्ता

**जळगाव । जितु इंगळे**

ग्वालियर येथे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची जाळपोळ केल्याची समाजात तीव्र संतापाची लाट उसळविणारी घटना घडली असून, या घटनेचा ऑल इंडिया पँथर सेनेच्या वतीने तीव्र शब्दांत निषेध करण्यात आला.या प्रकरणातील दोषींवर तात्काळ व कठोर कारवाई करण्यात यावी, तसेच जातीवादी व समाजात तेढ निर्माण करणारी वक्तव्ये करणाऱ्या अनिल मिश्रा याच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा, या प्रमुख मागणीसाठी रावेर येथील तहसीलदार व पोलिस निरीक्षक यांना अधिकृत निवेदन देण्यात आले. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय संविधानाचे शिल्पकार असून त्यांच्या प्रतिमेचा अवमान करणे म्हणजे देशाच्या संविधानावर आणि राष्ट्रीय एकतेवर घाला घालण्यासारखे आहे. अशा



समाजकंटकांवर वेळीच कठोर कारवाई झाली नाही, तर ऑल इंडिया पँथर सेना रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडेल, असा इशारा यावेळी देण्यात आला. या वेळी युवा रावेर तालुका अध्यक्ष जितु भाऊ इंगळे. तालुका उपाध्यक्ष श्रावण भालेराव . योगेश लहासे. महेंद्र बगाडे. सागर पानपाटील. प्रथमेश भास्कर. रोहन हिवरे. गौरव जाधव. पवन गाढे. अभि भालेराव. रोहित तायडे. महेंद्र वाघ. सागर भालेराव. अरबाज शेख..आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते

# केज मधून पत्रकारांची मोटार सायकल पळविली

## चोरटे सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद

दैनिक वादळ वार्ता

**गौतम बचुटे । केज**

केज शहरात मोटार सायकल चोरट्यांनी उच्छाद मांडला असून चोरट्यांनी बस स्टँड मधून एका पत्रकाराची मोटार सायकल लंपास केली आहे. मात्र चोरटा हा बस स्टँडवरच्या सीसीटिव्ही कॅमेऱ्यात कैद झाल्याने पोलिस त्याच्या मागावर आहेत.या बाबतची माहिती अशी की, दिनांक १४ जानेवारी रोजी पत्रकार महादेव काळे हे सायंकाळी ४:५८ वा.जण्याच्या सुमारास त्यांची मोटार सायकल क्र.(एम एच४४/आर०९९२) ही केज येथील बसस्टँड आवारातील क्रांती बुक स्टॉल समोर उभी करुन बाहेर गेले. त्या नंतर अवघ्या दहा मिनिटात ते परत आले त्यावेळी त्यांची मोटार सायकल त्या ठिकाणी नव्हती कोणी



तरी अज्ञात चोरट्यांनी मोटार सायकलचे हॅण्डल लॉक तोडून बनावट चावीने मोटार सायकल चालू करून लंपास केल्याचे निदर्शनास आले.या प्रकरणी महादेव काळे यांच्या तक्रारी वरून केज पोलिस ठाण्यात मारी ऊर्फ जुबेर मुस्ताक फारोकी (रा. केज जि. बीड) आणि एक अनोळखी या दोघांच्या विरुद्ध केज पोलिस ठाण्यात गु. र. नं. २१/२०२६ भा. न्या. सं. ३०३, ३(५) गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याचा तपास पोलिस हेड कॉन्स्टेबल महावीर सोनवणे हे तपास करीत आहेत.चोरटे सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद :- बस स्टँड परिसरात असलेला एका संशयित आरोपीकडे मोटार सायकल चोरी संबंधी त्याच्या दुसऱ्या साथीदाराची चौकशी केली पण तो मी नव्हेच अशी त्याने भूमिका घेतली. मात्र सीसीटीव्ही फुटेज तपासले असता मारी ऊर्फ जुबेर मुस्ताक फारोकी व एक त्याच्या सोबत लाल शर्ट व काळी पँट घातलेला अनोळखी इसम हे एकमेकांशी त्या नंतर बोलून सायकलीचे हॅन्डल लॉक तोडुन मोटार सायकल चोरून घेऊन गेल्याचे स्पष्ट दिसत आहे.

## प्राणघातक हल्ल्याचे सीसीटीव्ही गहाळ

# पत्रकार भगवान साकसमुद्रे यांची एसपींकडे धाव

दैनिक वादळ वार्ता

**परळी । प्रतिनिधी**

येथील सामाजिक कार्यकर्ते व निर्भीड पत्रकार भगवान साकसमुद्रे यांनी आपल्या जीवितास थेट धोका असल्याचा गंभीर आरोप करत बीड जिल्हा पोलिस अधीक्षक नवनीत काँवत यांच्याकडे पोलिस संरक्षणाची ठोस मागणी केली आहे. तसेच ०६ ऑगस्ट २०२० रोजी झालेल्या प्राणघातक हल्ल्याचे परळी पोलिसांकडून गहाळ करण्यात आलेले सीसीटीव्ही फुटेज त्वरित उपलब्ध करून द्यावे, अशी लेखी मागणी त्यांनी केली आहे.

दि. १२ जानेवारी २०२६ रोजी जिल्हा पोलिस अधीक्षकांची भेट घेऊन साकसमुद्रे यांनी सविस्तर निवेदन दिले. निवेदनात त्यांनी स्पष्टपणे नमूद केले आहे की, २०२० मध्ये माझ्यावर झालेल्या प्राणघातक हल्ल्याचा सीसीटीव्ही पुरावा उपलब्ध असतानाही, सेशन कोर्टातील तत्कालीन वकील लक्ष्मण फड यांनी भारतीय पुरावा कायदा कलम ६५ (ब) अन्वये प्रमाणपत्र असतानाही सदर फुटेज जाणीवपूर्वक न्यायालयासमोर सादर केले नाही. हा प्रकार म्हणजे न्यायप्रक्रियेची उघडपणे मोडतोड असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

सध्या अंबाजोगाई येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयात खटला सुरू असून, सीसीटीव्ही फुटेज हा निर्णायक इलेक्ट्रॉनिक पुरावा आहे. मात्र सदर फुटेज परळी संभाजीनगर पोलिस ठाण्याकडून आजतागायत उपलब्ध न करून देणे ही



बाब संशयास्पद असून पुरावा दडपण्याचा गंभीर प्रकार असल्याचे साकसमुद्रे यांनी म्हटले आहे.दरम्यान, या प्रकरणानंतर मला सातत्याने धमक्या मिळत असून, माझ्या जीवितास काही अनुचित घडल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी प्रशासनाची असेल, असा थेट इशारा त्यांनी दिला आहे. त्यामुळे तात्काळ पोलिस संरक्षण देणे आणि गहाळ सीसीटीव्ही फुटेज न्यायालयासमोर सादर करणे आवश्यक असल्याचे त्यांनी ठामपणे मांडले.या भेटीवेळी ॲड. के. डी. पाईकराव उपस्थित होते.

या प्रकरणामुळे पत्रकारांची सुरक्षितता, पोलिस तपासाची पारदर्शकता आणि न्यायव्यवस्थेवरील विश्वास या तिन्ही मुद्द्यांवर गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहिले असून, प्रशासन या प्रकरणात काय भूमिका घेते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

## बीडमध्ये डुप्लिकेट दारूचा धंदा! सम्राट वाईन शॉपवर तात्काळ कारवाईची मागणी

दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील सम्राट वाईन शॉपमध्ये खुलेआम डुप्लिकेट व बनावट दारूची विक्री सुरू असल्याचा गंभीर आरोप दलित पँथर संघटनेने केला असून, याप्रकरणी दोषींवर तात्काळ कठोर कारवाई करण्याची मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

दलित पँथरचे जिल्हाध्यक्ष धनानंद वाघमारे यांनी दिलेल्या माहितीनुसार, सदर वाईन शॉपमध्ये बनावट लेबल लावलेली, निकृष्ट व आरोग्यास घातक अशी दारू विकली जात असून यामुळे नागरिकांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण झाला आहे. विशेष म्हणजे अशा प्रकारच्या दारूमुळे भविष्यात मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

निवेदनात म्हटले आहे की, बेकायदेशीर दारू विक्रीमुळे शासनाचा महसूल बुडत असून कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत आहे. संबंधित यंत्रणांनी डोळेझाक केल्यास यामागे कोणाचा आशीर्वाद आहे का, असा सवालही उपस्थित करण्यात आला आहे.

दलित पँथरने स्पष्ट इशारा दिला आहे की, जर सम्राट वाईन शॉपचा परवाना तात्काळ रद्द करून दोषींवर गुन्हे दाखल केले नाहीत, तर लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडले जाईल. याची संपूर्ण




जबाबदारी प्रशासनाची असेल, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणाची दखल घेऊन जिल्हा प्रशासनाने त्वरित चौकशी करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी सर्व स्तरातून होत आहे

# संपादकीय

## भूतकाळातून बोध, भविष्याकडे वाटचाल




नववर्ष म्हणजे केवळ कॅलेंडरवरील तारीख बदलण्याचा क्षण नव्हे, तर आत्मपरीक्षणाचा, संकल्पांचा आणि नव्या आशांचा प्रारंभ असतो. सरत्या वर्षाला निरोप देत आणि येणाऱ्या वर्षाचे स्वागत करताना आपण काय कमावले, काय गमावले आणि पुढे काय साध्य करायचे याचा विचार होणे आवश्यक ठरते. विशेष म्हणजे २०२६ हे वर्ष राज्यासाठी 'भरती वर्ष' म्हणून घोषित झाल्याने सुशिक्षित बेरोजगारांच्या मनात नव्या संधींची आशा पल्लवित झाली आहे. त्यामुळे हे नववर्ष उत्सवापुरते न राहता रोजगार, जबाबदारी आणि परिवर्तनाच्या दिशेने वाटचाल करण्याचे प्रतीक ठरणार आहे. सन २०२६ हे वर्ष महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'भरती' वर्ष म्हणून ५ ऑक्टोबर २०२५ रोजी घोषित केले आहे. केव्हा एकदा २०२६ साल सुरू होऊन भरती होते असे राज्यातील सुशिक्षित बेकारांना वाटत आहे. त्यामुळे राज्यामधील सुशिक्षित बेरोजगारसुद्धा नवीन वर्षाच्या स्वागतासाठी तयार आहेत. नवीन वर्षामध्ये रोजगाराच्या विविध संधी प्राप्त होणार आहेत. त्यामुळे नवीन वर्षाचे स्वागत करताना सुशिक्षित बेरोजगारांच्या दृष्टिकोनातून भरती वर्ष म्हणून नववर्षाचे स्वागत केले जाणार आहे. आपण अजून चार दिवसांनी सरत्या वर्षाला 'गुड बाय' आणि नववर्षाला 'वेलकम' करणार आहोत. असे आपण दरवर्षी करत असतो. मात्र त्यातून आपण काय शिकलो याचा आपण सर्वांनी विचार करणे गरजेचे आहे. नववर्षाच्या पहिल्या दिवशी आपण आनंद व्यक्त करीत असताना मागील वर्षात माझे काय चुकले याचे प्रत्येकांनी आत्मपरीक्षण करणे गरजेचे आहे. आज आपला देश ७९ व्या स्वातंत्र्य वर्षांत वावरताना इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त झाला तरी देशात खरंच आपण स्वातंत्र झालो का? याचा विचार सुद्धा होणे आवश्यक आहे. असे असले तरी बऱ्याचवेळा मागील वर्षामध्ये आलेली संकटे विसरून नवीन आठवणी जतन करीत असतो. अनेक लोक घरामध्ये रोषणाई व घराच्या समोर फटाक्यांची आतषबाजी करतात. म्हणे झाले गेलं विसरून नवीन जीवनाला सुरुवात करूया. महत्त्वाची बाब म्हणजे मागील वर्षाचा अनुभव गृहीत धरून, नव्या वर्षात नवीन उद्दिष्टे लक्षात घेऊन नवीन जीवनाला सुरुवात करू शकतो. यातून नवीन संधी मिळून नवीन दृष्टिकोन स्वीकारला जातो. म्हणजे आपल्या जीवनात सुधारणा करण्याची हीच वेळ असते. यातूनच नवीन प्रवास करण्याची अचूक वेळ मिळते. तेव्हा प्रत्येकांनी नवीन वर्षाची सुरुवात करताना आपल्या मागील वर्षातील चुका सुधारून नवीन वर्षात आपल्याला कसा फायदा होईल याचा शोध घेणे गरजेचे असते. यातूनच आपली प्रगती होत असते. नवीन वर्ष, नवीन सुरुवात असे जरी म्हणालो तरी यातून परिवर्तन होत असते. यासाठी नवीन संकल्प अतिशय महत्त्वाचा असतो. यातूनच विकासाची नवीन संधी प्राप्त होत असते. यात काही उद्दिष्ट्ये लक्षात घेता प्राधान्यक्रमानुसार सोडवू शकतो. यातूनच आपला उत्साह वाढण्यास मदत होते. आपल्या मनातील भीती दूर होऊन चांगल्या संधीचा मार्ग मोकळा होतो. त्यामुळे आपण नवीन वर्षानिमित्ताने जी उद्दिष्ट्ये डोळ्यांसमोर ठेवतो त्याविषयी आपला आत्मविश्वास वाढून आपण प्रेरित होतो. नवीन वर्षाचे स्वागत करून नवीन वर्षाची सुरुवात करीत असतो तेव्हा मागील वर्षाचा विचार करणे गरजेचे आहे. आपण सर्वजन विविध क्षेत्रांत काम करत असताना आपण केलेले चांगले काम आणि काही कामात आलेले अपयश त्याचा आढावा घ्यावा. तसेच आपण मागील वर्षी कोणकोणती कामे केली अथवा नाही केली याचे चिंतन करून सुधारणा करण्यात याव्यात. आता वर्ष सुरू झाल्यावर आपली उद्दिष्टे निश्चित करून विविध क्षेत्रांनुसार वर्गवारी करावी. त्यानंतर त्यांची क्रमवारी लावून त्यांच्या प्रगतीचा आढावा घ्यावा. असे टप्प्याटप्प्याने करावे. म्हणजे वर्षभरामध्ये निश्चित केलेली उद्दिष्टे किती प्रमाणात साध्य झाली याची सहज कल्पना येते. याचा परिणाम पुढील काळात विकासाची दिशा ठरवू शकतो. असे असले तरी प्रत्येक उद्दिष्टांचे मूल्यमापन होणे गरजेचे आहे. यामुळे आपल्या प्रगतीची कल्पना येते. तेव्हा आपल्याला प्रेरणा कशी मिळेल या दृष्टिकोनातून काम करावे. जेणेकरून आपण जी उद्दिष्टे निश्चित केलेली आहेत त्या संदर्भात सकारात्मक दृष्टिकोन असायला हवा. आपले लक्ष विचलित होणार नाही याची दक्षता घ्यावी लागेल. यासाठी चांगल्या लोकांच्या सहवासात राहाणे, नियमितपणे व्यायाम, मान्यताप्राप्त पुस्तकांचे वाचन करावे. इतकेच नव्हे तर आपल्या मनाची सुद्धा तयारी असणे आवश्यक आहे. एखादा कठीण वाटणारा विषय कसा सोपा करता येईल त्या दृष्टीने प्रयत्न करावा. आपण ठरविलेली उद्दिष्टे इतरांना सुद्धा सांगा. उद्दिष्टांच्या प्रगतीचा वेळच्या वेळी आढावा घ्या. ज्या उद्दिष्टांमध्ये आपण यशवंत झालो असू त्यांचा छोटेखानी यशस्वी विजय म्हणून साजरा करा. यात विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊ नये. नवीन वर्ष म्हणजे अंतिम परीक्षेचे वर्ष. त्यामुळे होणारी बोर्डाची परीक्षा विद्यार्थ्यांच्या करिअरच्या दृष्टिकोनातून अतिशय महत्त्वाची असते. तेव्हा त्यांनी आपले लक्ष अभ्यासाकडे केंद्रित करावे. आता २०२६ या नवनिर्वाचित वर्षात पदार्पण करीत असताना प्रत्येकांनी लक्षात ठेवले पाहिजे की, नवीन वर्ष आहे तेव्हा मागील वर्षातील काही कटू अनुभव आलेले असतील, तर त्यांना बाजूला ठेवून परिवर्तनाच्या दिशेने वाटचाल करूया. भूतकाळ विसरून भविष्यकाळाचा विचार करूया. हे वर्ष भरती वर्ष असून वर्षभरात कशाप्रकारे भरती केली जाणार आहे याची सुद्धा सर्वांना कल्पना येणार आहे. तेव्हा भरती सत्र चालू असताना कोणावर अन्याय होणार नाही यावर करडी नजर ठेवायला हवी. कारण लोकशाहीप्रधान भारत देशाचे आपण सुजाण नागरिक आहोत याची जाणीव सर्वांना आहे. त्यामुळे आपला २०२६ या वर्षातील प्रवास सुखद होण्यासाठी वचनबद्ध होऊ या.

# Amazon ग्रेट रिपब्लिक डे सेल २०२६ सेल दरम्यान या टॅब्लेटवर मोठी सूट

दैनिक वादळ वार्ता




अमेझॉन ग्रेट रिपब्लिक डे सेल २०२६ च्या तारखांची घोषणा झाल्यानंतर आता वस्तूंवरील डीलबद्दल सांगितले जात आहे. अमेझॉनने हळूहळू डील उघड करण्यास सुरुवात केली आहे. जर तुम्ही नवीन टॅबलेट खरेदी करण्याचा विचार करत असाल तर सेल दरम्यान तुम्ही नवीन टॅबलेटवर हजारो रूपयांची बचत करू शकता. सेल दरम्यान इलेक्ट्रॉनिक्स आणि ॲक्सेसरीजवर ७५ टक्क्यांपर्यंत सूटवर उपलब्ध असणार आहे. सेलच्या मायक्रोसाइटवरून असे दिसून येते की Xiaomi आणि OnePlus ब्रँडचे टॅब्लेट धमाकेदार सुट देऊन विक्रीसाठी उपलब्ध करण्यात आले आहेत.

**XI-OMI Pad ७ ची भारतातील किंमत**

नॅनो-टेक्श्चर डिस्प्ले असलेला हा शाओमी टॅबलेट सध्या विक्री सुरू होण्यापूर्वी Amazon वर ३१ हजार ९९९ रूपयांमध्ये विक्रीसाठी उपलब्ध केला जात होता, परंतु विक्री दरम्यान यावर बंपर सुट देण्यात आली आहे त्यामुळे हा टॅबलेट २५ हजार ९९९ रूपयांमध्ये तुम्हाला खरेदी करता येणार आहे. याचा अर्थ असा की या टॅबलेटवर ६००० रूपयांची सुट देण्यात येत आहे.

वनप्लस पॅड गो २ ची भारतातील किंमत

२.८ के रिझोल्यूशन आणि १२.१-इंच डिस्प्ले असलेला हा टॅबलेट सध्या सेलपूर्वी ३१ हजार ९९९ रूपयांमध्ये विकला जात आहे. या किमतीत तुम्हाला ८ जीबी रॅम आणि २५६ जीबी स्टोरेज व्हेरिएंट मिळेल. १००५० एमएएच बॅटरीसह पॅक केलेला हा टॅबलेट सेल दरम्यान २९ हजार ९९९ रूपयांमध्ये विकला जाईल. याचा अर्थ असा की तुम्ही सेल दरम्यान हा टॅबलेट २००० कमी किमतीत खरेदी करू शकाल.

अतिरिक्त बचत कशी करावी

वर नमूद केलेल्या टॅब्लेटवरील उत्पादन सवलतींव्यतिरिक्त तुम्ही बँक कार्डसह अतिरिक्त बचतीचा आनंद घेऊ शकता. जर तुम्ही तुमचा टॅब्लेट खरेदी करताना डइख क्रेडिट कार्डने पैसे दिले तर तुम्हाला १०% त्वरित सवलत देखील मिळेल, ज्यामुळे दुप्पट बचत होईल. तुम्ही या सेल मध्ये एक्सचेंज ऑफरचा देखील लाभ घेऊ शकाल. शिवाय सेल दरम्यान ग्राहकांच्या सोयीसाठी नो-कॉस्ट EMI उपलब्ध असणार आहे. ज्यामुळे तुम्ही आवडत्या वस्तू खरेदी करू शकाल.

# मायक्रोवेव्ह साफ करताना करताय 'ही' मोठी चूक? लवकरच होईल खराब

दैनिक वादळ वार्ता



हिवाळ्यात सर्वांनाच गरम अन्न आवडते. यासाठी घरांमध्ये मायक्रोवेव्हचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. सर्व प्रकारचे अन्न मायक्रोवेव्हमध्ये गरम केले जाते. अन्न गरम करणे खूप सोपे आहे, परंतु कधीकधी मायक्रोवेव्हमध्ये अन्न सांडते, ज्यामुळे त्यावर डाग लागतात. मायक्रोवेव्ह स्वच्छ करणे हे अन्न गरम करण्याइतकेच सोपे आहे. बरेच लोक मायक्रोवेव्ह साफ करताना चुका करतात, ज्यामुळे त्याचे आवरण आणि अंतर्गत भाग खराब होऊ शकतात. येथे, आम्ही तुम्हाला मायक्रोवेव्ह साफ करताना कोणत्या गोष्टी टाळाव्यात हे सांगू जेणेकरून तुमच्या मायक्रोवेव्हला कोणतेही नुकसान होऊ नये.

आतील भाग स्वच्छ करणे: तुमच्या मायक्रोवेव्हची स्वच्छता करणे खूप महत्वाचे आहे. प्रत्येक मायक्रोवेव्हचे आतील भाग वेगवेगळ्या पदार्थांपासून बनलेले असते. काही मायक्रोवेव्ह स्टेनलेस स्टील वापरतात, जे स्वच्छ करणे सोपे असते. जुन्या मॉडेल्समध्ये रंगवलेले किंवा इनॅमल केलेले पृष्ठभाग असू शकते. प्रथम, तुमच्या मायक्रोवेव्हमध्ये काय आहे आणि ते खराब न करता तुम्ही ते कसे स्वच्छ करू शकता ते समजून घ्या.

मायक्रोवेव्हमध्ये अनेक घटक असतात जे काढून स्वच्छ करता येतात. यामध्ये टर्नटेबल (फिरणारी प्लेट), सपोर्ट रिंग किंवा रोलर आणि रॅक यांचा समावेश आहे. हे सर्व काढून टाका आणि ते वेगळे धुवा. टर्नटेबल सहसा डिशवॉशरमध्ये धुता येते. मायक्रोवेव्ह ओव्हनच्या भिंती, छत आणि दरवाजा स्वच्छ करणे देखील महत्त्वाचे आहे. टर्नटेबलशिवाय कधीही मायक्रोवेव्ह वापरू नका हे लक्षात ठेवा. साफसफाई आणि वाळवल्यानंतर ते लगेच बदला.

ओव्हन क्लीनर कोटिंगला नुकसान पोहोचवू शकतात: तुमचे ओव्हन किंवा मायक्रोवेव्ह स्वच्छ करण्यासाठी ओव्हन क्लीनर वापरणे टाळा. हे खूप कठोर असतात आणि उच्च तापमानासाठी डिझाइन केलेले असतात. या क्लीनरमध्ये अनेकदा अशी रसायने असतात जी तुमच्या मायक्रोवेव्हच्या आत कोटिंगला नुकसान पोहोचवू शकतात आणि विषारी अवशेष सोडू शकतात.

स्क्रबर ओव्हनला नुकसान पोहोचवू शकतात: खडबडीत स्क्रबरऐवजी मऊ कापड, स्पंज किंवा मायक्रोफायबर टॉवेल वापरा. स्क्रबर तुमच्या मायक्रोवेव्हला नुकसान पोहोचवू शकतात. ब्लीच काही पृष्ठभागावरील जंतू काढून टाकते, परंतु ते मायक्रोवेव्हसाठी खूप कठोर असते आणि तीव्र वास सोडू शकते. अमोनिया-आधारित क्लीनर काही मायक्रोवेव्ह फिनिश देखील खराब करू शकतात.कधीही व्हेंट्स किंवा कंट्रोल पॅनलवर थेट काहीही स्प्रे करू नका, कारण पाणी आत जाऊ शकते आणि इलेक्ट्रिकल भागांना नुकसान पोहोचवू शकते. या गोष्टी लक्षात ठेवल्यास तुम्ही तुमचे ओव्हन सुरक्षितपणे स्वच्छ करू शकता.

# मोरींगा पावडर हिवाळ्यात खाल्ल्यामुळे शरीराला काय फायदे होतात?

दैनिक वादळ वार्ता



हिवाळा हा एक अतिशय आनंददायी हंगाम आहे, परंतु या ऋतूत आरोग्याच्या समस्या बर् याचदा वाढतात. हिवाळ्यात प्रतिकारशक्ती कमी होते, ज्यामुळे थकवा, सांधेदुखी आणि कोरडी त्वचा यासारख्या समस्याही उद्भवतात. मात्र, या सर्व समस्या कमी करण्यासाठी विविध प्रकारच्या औषधांचा वापर करण्याची गरज नाही. फक्त एक पावडर पुरेसे आहे आणि ते म्हणजे मोरिंगा पावडर. मोरिंगा पावडर आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. हिवाळ्यात दररोज सकाळी एक चमचा (H2-5 ग्रॅम) मोरिंगा पावडर घेतल्याने अनेक आजारांपासून बचाव होतो आणि रोग प्रतिकारशक्ती वाढते. जीवनसत्त्वे ए, सी, ई, बी कॉम्प्लेक्स, लोह, कॅल्शियम आणि पोटॅशियम सारख्या आवश्यक पोषक द्रव्ये समृद्ध असतात.मोरिंगा पावडर अँटीऑक्सिडंट्स ऑक्सिडेटिव्ह ताण कमी करून रोग प्रतिकारशक्ती, त्वचा आणि केसांचे आरोग्य मजबूत करतात. इंडियन जर्नल ऑफ फिजिओलॉजी अँड फार्माकोलॉजीच्या अहवालानुसार, मोरिंगामुळे लिम्फोसाइट क्रियाकलाप वाढू शकतो, जरी मानवी चाचण्या सध्या मर्यादित आहेत. मोरिंगा पावडरध्ये जीवनसत्त्वे सी, ई आणि लोह चांगले प्रमाणात असते, जे रोग प्रतिकारशक्ती मजबूत करते, जे सर्दीसारख्या हिवाळ्याच्या संसर्गापासून संरक्षण करू शकते. पॉलीफेनोल्स, फ्लेव्होनॉइड्स डेटानुसार, ते आयएल -६ आणि टीएनएफ -ँ सारख्या जळजळ होण्याचे मार्कर कमी करते.क्लिनिकल चाचण्यांमध्ये (NCT07194577), दररोज ५.५ ग्रॅम मोरिंगा पावडरने ग्लूकोज आणि लिपिड प्रोफाइल सारख्या चयापचय सिंड्रोम घटकांमध्ये सुधारणा दर्शविली. थंड, कोरडी हिवाळ्यातील हवा त्वचेला ओलावा काढून टाकते, ज्यामुळे त्वचा कोरडी आणि खवले येते, ज्यामुळे त्वचेवर पुरळ आणि खाज सुटू शकते. शेवग्याच्या पावडरमध्ये जीवनसत्त्वे अ आणि ई समृद्ध असतात. हे त्वचेला आतून पोषण देते. हे त्वचेची लवचिकता राखण्यास, कोरडेपणा रोखण्यास आणि त्वचेला मऊ आणि मॉइश्चराइझ ठेवण्यास मदत करते. त्यात असलेले अँटीऑक्सिडंट्स सुरकुत्या रोखतात आणि वृद्धत्वाची प्रक्रिया कमी करतात.

हिवाळ्यात मोरींगा पावडर खाणे आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर मानले जाते, कारण हिवाळ्यात शरीरातील पोषण घटण्याची आणि रोग प्रतिकारशक्ती कमी होण्याची शक्यता वाढते. मोरींगा पावडर हा नैसर्गिक सुपरफूड मानला जातो, त्यात प्रथिने, जीवनसत्त्वे (विशेषतः व्हिटॅमिन C,A, B-कॉम्प्लेक्स), खनिजे (कॅल्शियम, लोह, पोटॅशियम, मॅग्नेशियम) आणि अँटिऑक्सिडंट्स मुबलक प्रमाणात असतात. हिवाळ्यात शरीराला उष्णता टिकवण्यासाठी आणि रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी मोरींगा पावडर अत्यंत उपयुक्त ठरते. यामुळे सर्दी, खोकला, घसा दुखणे, दमा किंवा इतर श्वसनविकारापासून संरक्षण मिळते.मोरींगा पावडर पचनसंस्थेसाठीही फायदेशीर आहे. हिवाळ्यात लोक अन्न अधिक तेलकट, तुपकट किंवा भारी घेतात, ज्यामुळे पचनाची समस्या निर्माण होऊ शकते. मोरींगा पावडर पचन सुधारते, बद्धकोष्ठता कमी करते आणि शरीरातील विषारी घटक बाहेर काढण्यास मदत करते. तसेच मोरींगामध्ये असलेले अँटिऑक्सिडंट्स त्वचा आणि केसांसाठीही लाभदायक आहेत. हिवाळ्यात त्वचा कोरडी होत असल्यास मोरींगा पावडर सेवन केल्यास त्वचा मऊ, तजेलदार आणि पोषित राहते. हृदयाचे आरोग्य टिकवण्यासाठी मोरींगा पावडर उपयुक्त असून रक्तदाब नियंत्रित ठेवते, कोलेस्ट्रॉल संतुलित ठेवते आणि रक्ताभिसरण सुधारते. मोरींगा पावडर नियमित सेवन केल्यास शरीराची उर्जा टिकून राहते, थकवा कमी होतो आणि संपूर्ण आरोग्य सुधारते.हिवाळ्यात मोरींगा पावडर गरम पाण्यात, दूधात किंवा सूपमध्ये मिसळून घेतले तरी फायदेशीर ठरते. या पावडरचा नियमित, योग्य प्रमाणात सेवन केल्यास रोगप्रतिकारक शक्ती वाढते, शरीरात पोषण संतुलित राहते, त्वचा व केस निरोगी राहतात आणि हिवाळ्यातील सर्दी, खोकला व थकव्याचा त्रास कमी होतो. एकूणच, मोरींगा पावडर हा हिवाळ्यातील नैसर्गिक, सुरक्षित आणि प्रभावी आरोग्यसाधक उपाय आहे.

# बर्डीपाडा टोलनाक्याजवळ आयशर ट्रकचा भीषण अपघात 'अपघाताचा सापळा' बनलेल्या महामार्गावर सुरक्षा वाऱ्यावर

## प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे सुदैवाने जीवितहानी टळली; दिशादर्शक फलकांचा अभाव ठरतोय जीवघेणा

दैनिक वादळ वाता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

धुळे-सुरत राष्ट्रीय महामार्गावर अपघातांची मालिका सुरूच असून, बुधवारी रात्री नऊ वाजेच्या सुमारास बर्डीपाडा टोलनाक्याजवळ एक आयशर ट्रक भीषण अपघाताचा बळी ठरला. या अपघातात ट्रकचे प्रचंड नुकसान झाले असले तरी, सुदैवाने चालक थोडक्यात बचावला आहे. मात्र, या घटनेने महामार्ग प्रशासन आणि संबंधित ठेकेदाराच्या सुरक्षेबाबतच्या दाव्यांची पोलखोल केली आहे.

**नेमकी घटना काय?**

मिळालेल्या माहितीनुसार, आयशर ट्रक (क्रमांक एम एच ४० डी सी ७७७४) धुळ्याकडून सुरतच्या दिशेने जात होता. बर्डीपाडा टोलनाक्याजवळ पोहोचल्यानंतर चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि ट्रक भीषणरीत्या पलटी झाला. हा अपघात इतका भीषण




होता की, ट्रकचे पुढचे टायर निखळून पडले आणि केबिनचा चक्काचूर झाला. ट्रक चालक संदीप परपेती (राहणार सारवाडी, जिल्हा वर्धा) हे या घटनेत किरकोळ जखमी झाले असून त्यांच्यावर प्राथमिक उपचार करण्यात आले आहेत.

अपघातानंतर आपली प्रतिक्रिया देताना चालक संदीप परपेती यांनी संताप व्यक्त केला. ते म्हणाले की, टोलनाका जवळ येत असताना रस्त्यावर कोणतेही स्पष्ट दिशादर्शक फलक, रेडियम स्टिकर्स किंवा सूचना फलक नव्हते. अंधारामुळे रस्ता नेमका कुठे वळतोय हे न समजल्याने नियंत्रण सुटले. टोलनाक्यावर पुरेसे बॅरिकेड्स आणि प्रकाश व्यवस्था नसल्यानेच हा अपघात झाल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

बर्डीपाडा टोलनाका हा सध्या वाहनधारकांसाठी डेथ ट्रॅप बनत चालला आहे. या ठिकाणी खालील गंभीर त्रुटी आढळून येत आहेत ज्यामध्ये रात्रीच्या वेळी टोलनाका परिसरात पुरेसा उजेड नसतो.दुरुस्ती किंवा वळणांच्या ठिकाणी रेडियम नसल्याने रात्री रस्ता दिसत नाही.टोलनाका येण्यापूर्वी किमान ५०० मीटरपासून सूचना असणे आवश्यक आहे, त्या येथे दिसत नाहीत.

येथे वारंवार अपघात होत आहेत. महामार्ग प्राधिकरण आणि ठेकेदार केवळ टोल वसुलीत मग्न असून प्रवाशांच्या सुरक्षेकडे त्यांचे पूर्णतः दुर्लक्ष आहे. एखाद्याचा बळी गेल्यावरच प्रशासन जागे होणार का? असा संतप्त सवाल स्थानिक नागरिकांनी उपस्थित केला आहे.

अपघातानंतर महामार्गावरील वाहतूक काही काळ ठप्प झाली होती. घटनेची माहिती मिळताच महामार्ग पोलीस आणि संबंधित यंत्रणेने घटनास्थळी धाव घेत क्रेनच्या साहाय्याने ट्रक बाजूला केला आणि वाहतूक सुरळीत केली.

भविष्यात अशा दुर्घटना टाळण्यासाठी महामार्ग प्राधिकरणाने तातडीने या ठिकाणी 'रोड सेफ्टी ऑडिट' करून आवश्यक त्या सुधारणा कराव्यात, अशी मागणी जोर धरत आहे.

# १६ जानेवारी नंतर गाळपास येणाऱ्या उसाला भीमा पाटस २०० रु.जादा देणार:आ.राहुल कुल

दैनिक वादळ वार्ता

**पाटस(पुणे) । प्रतिनिधी**

एम.आर.एन.भीमा शुगर पॉवर प्रा.लि (निराणी शुगर्स लि.),पाटस, ता.दौंड या कारखान्याच्या गाळप हंगाम - २०२५ - २६ करिता येणाऱ्या प्रति टन उसाला ३१००/- पहिला हप्ता दिलेला आहे.

आता दि.१६ जानेवारीनंतर गाळपास येणाऱ्या उसाला प्रति टन २००/- अतिरिक्त अनुदान, म्हणजेच दि. १६ जानेवारीनंतर गाळपास येणाऱ्या उसाला प्रति टन ३३००/- ऊस दर देणार असल्याची माहिती कारखान्याचे अध्यक्ष आमदार अँड.राहुल कुल यांनी दिली आहे.

हंगाम २०२५-२६ करिता आलेल्या उसाचा अंतिम दर दौंड तालुक्यातील इतर कारखान्यांच्या बरोबरीने देणार असल्याचे अँड.राहुल कुल यांनी आश्वस्त केले आहे.

कारखान्याने दि.१२ जानेवारीपर्यंत ५४०८४८ मे.टन ऊस गाळप केले असून, ५३१०५०क्विंटल साखर उत्पादीत केली आहे. कारखान्याचा सरासरी साखर उतारा ११.३४% राखला आहे. कारखान्याच्या



डिस्टीलरी प्रकल्पतून आतापर्यंत ८८४८६३ लिटर उच्च प्रतीचे इथेनॉल उत्पादीत केले असून २६७७३२१ लिटर रिक्टिफाईड स्पिरिट उत्पादीत केले आहे.सहवीज निर्मिती प्रकल्पतून आज अखेरीस २१७५९५३७ युनिट्स वीज निर्मिती केली असून १६७५८२३७ युनिट्स स्ववापर करून ५१८२२०० वीज निर्यात केली आहे.या वर्षी कारखान्याच्या इतिहासात प्रथमच एका दिवसात ११,००० मे.टन ऊस गाळप केले असल्याचे एमआर एन भीमाचे कार्यकारी संचालक रविकांत पाटील यांनी दिली आणि त्याच बरोबर कारखान्याच्या सभासदांनी आपल्या हक्काच्या कारखान्याला जास्तीत जास्त ऊस देऊन सहकार्य करावे असे आवाहन रविकांत पाटील यांनी केले आहे.

कारखान्याला ऊस पुरवठा करणाऱ्या शेतकऱ्यांचे, कारखान्यातील सर्व अधिकारी, कर्मचारी आणि युनियन पदाधिकाऱ्यांचे निराणी ग्रुप्स चे अध्यक्ष मुरुगेश निराणी, एक्झिक्युटीव्ह डायरेकटर संगमेश निराणी,ग्रुपचे कार्यकारी संचालक विजय निराणी संचालक विशाल निराणी यांनी आभार मानले.

# कै.सौ.चंद्रकला माध्यमिक विद्यालय, खांडी पिंपळगाव येथे राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती उत्साहात साजरी

दैनिक वादळ वार्ता

**खुलताबाद** । प्रतिनिधी

खांडी पिंपळगाव येथे आज दिनांक १२ जानेवारी २०२६ रोजी कै. सौ. चंद्रकला माध्यमिक विद्यालयाच्या वतीने राजमाता जिजाऊ जयंती तसेच स्वामी विवेकानंद जयंती (युवा दिन) मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्ताने सामूहिक सूर्यनमस्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या उपक्रमात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, खांडी पिंपळगाव, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, जाफरवाडी तसेच कै. सौ. चंद्रकला माध्यमिक विद्यालयातील एकूण २५० विद्यार्थी उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध पद्धतीने सूर्यनमस्कार सादर करून आरोग्य, संस्कार आणि राष्ट्रभक्तीचा संदेश दिला.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून माजी सरपंच श्री. अशोक उबाळे, श्री. मिठूभाऊ महालकर (राष्ट्रवादी काँग्रेस, अजितदादा गट - सरचिटणीस), श्री. फकीराराव भालेराव (रिपाई - तालुकाध्यक्ष) यांची उपस्थिती लाभली. तसेच श्री. मच्छिंद्र महालकर, श्री. भारत



महालकर, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खांडी पिंपळगावचे मुख्याध्यापक श्री. गणेश काळे, श्री. मार्तंड चौधरी सर, श्री. माळी सर, श्री. भंडारी सर, श्री. विनोद घुसळे, श्री. राजेंद्र भालेराव, श्री. जगदीश महालकर आदी मान्यवर उपस्थित होते.

कै. सौ. चंद्रकला माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. संजय साळुंके यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. यावेळी श्री. माणिक सपकाळ, श्री. चरणसिंग राठोड, श्री. रंजन कच्छवा, श्री. रितेश ठाकूर, श्री. सुशीलकुमार वडोदे यांचीही उपस्थिती होती.

राजमाता जिजाऊ यांच्या आदर्श मातृत्वाचा आणि स्वामी विवेकानंदांच्या प्रेरणादायी विचारांचा वारसा जपत युवकांमध्ये आरोग्य, शिस्त व राष्ट्रसेवेची जाणीव निर्माण करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल उपस्थित मान्यवरांनी शाळेचे कौतुक केले.

# नॅशनल सिनियर लेवल अथलॅटींक दिल्ली मधील गोपाळ कांबळे यांच्या कामाला यश व उंच भरारी

दैनिक वादळ वार्ता

**हाणेगाव । प्रतिनिधी**

दिल्ली येथे घेण्यात आलेल्या मॅरेथॉन धावण्याच्या शर्यतीमध्ये मुखेड तालुक्यातील माकणी येथील राहणारा व गोपाळ कांबळे या विद्यार्थ्याने दोन मिनिट ३१ सेकंदामध्ये ८०० धावण्याच्या शर्यती मध्ये प्रथम क्रमांक मिळवून सुवर्णपदक मिळविले आहे तर शंभर मीटर अंतर अवघ्या १३ सेकंदामध्ये पार करून सिल्वर मेडल व तसेच २६ सेकंदामध्ये २०० मीटर धावण्याच्या शर्यतीत सिल्वर मेडल मिळून आपले नाव लौकिक केलेले आहे त्यामुळे त्याचे सर्वत्र कौतुक होत असून अनेक जणांनी त्यांना शुभेच्छा देऊन त्याचे कौतुक करत आहेत-

८०० मीटर २:३१ गोल्ड मेडल




१००मीटर १३ सेकडं सिल्वर मेडल

२०० मीटरकर२६ सेकंद सिल्वर मेडल

माकणी गावचा एक खेळाडू(नॅशनल सिनियर लेवल अथलॅटींक दिल्ली )मध्ये महाराष्ट्रातून गोपाळ कांबळे नांदेडकर यांची दिल्ली मध्ये उंच भरारी

८००मीटर हे रेस २ मिनटं ३१ सेकंद मध्ये पार करून पहिला नंबर पटकवाला आहे.

१००मीटर हे रेस १३ सेकंद मध्ये पार करून दुसरा नंबर पटकवला आहे.

२०० मीटर मध्ये २६ सेकंद मध्ये पार करून दुसरा रंक

मी २०१९ पासून प्रॅक्टिस ला सुरवात केला. २०२०,२०२१,२०२२, २०२३, २०२४.....हे सगळे वर्ष फेल गेले. कमीत कमी मी या ६ वर्षात ७८ रेस मध्ये पार्टीसिपीट केलो. म्हणजे मी ७८ रेस मी फिनिशर केलो. पण मॅरेथॉन मध्ये फिनिशर करण सुद्धा काही जणांना जमत नाही. मी पुणे इंटेंटनेशनल मध्ये ४२किलोमीटर हे रेस ६ तासात फिनिशर केलो तसेच, अपोलो टायर नॅशनल लेवल दिल्ली मध्ये ४२ किलो मीटर हे ५ तास १५ मिनिटात फिनिशर केलो.

पण पहिला आलो नाही............ तेव्हा माज्या जीवनात नवीन सोनेरी दिवस २८डिसेम्बर २०२५ या दिवशी दिल्ली येथे स्पर्धा घेण्यात आली होती यावेळी गोपाळ कांबळे यांनी घवघवीस यश मिळवले असून त्यांच्या या कार्याचे अनेकांनी कौतुक केले धुरपतबाई चांदोबा कांबळे , सौ अरुणा गुणवंत कांबळे,चंद्रकांत कांबळे सर, सुशील गायकवाड, किशोर आडेकर, प्रशांत कांबळे, सुरेश कांबळे, प्रवीण गायकवाड, डॉ, रविकांत कांबळे राजेंद्र कांबळे, पंचशीला (रिंकी) कांबळे, आदींनी शुभेच्छा दिल्या

# स्वराज्यनिर्मितीचा पाया घडविणाऱ्या राष्ट्रमाता जिजाऊ-सय्यद सज्जाद

दैनिक वादळ वार्ता

**पाटोदा । प्रतिनिधी**

चुंबळी येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले ,राष्ट्रमाता माँसाहेब जिजाऊ ,शेख फातिमा व स्वामी विवेकानंद यांची संयुक्त जयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे सामाजिक कार्यकर्ते तथा सेवा सोसायटी संचालक सज्जाद भाई सय्यद यांनी विद्यार्थ्यांना जयंती विषयी बोलताना सांगितले की, राष्ट्रमाता माँसाहेब जिजाऊ सावित्रीबाई फुले शेख फातिमा यांचे विचार मुलींनी अंगीकृत करणे गरजेचे काळाची गरज आहे . स्वराज्य निर्मितीमध्ये राजमाता जिजाऊंचे अमूल्य योगदान राहिले शिक्षणासाठी सावित्रीबाई फुले व त्यांच्या सोबत सहकारी शेख फातिमा यांनी परिश्रम घेतले. त्यांना आपण आदर्श स्थानी ठेवले पाहिजे, असे यावेळी सांगितले .यावेळी उपस्थित कार्यक्रमाचे अध्यक्ष कॉम्रेड महादेव नागरगोजे, ह. भ. प. पांडुरंग महाराज पवळ मुख्याध्यापक खाडे सर, क्रांतिसिंह नाना पाटील मुख्याध्यापक टेकाळे सर, चव्हाण सर, दराडे सर, नागरगोजे सर, कादरी सर, पवळ सर ,नाईकवडे सर, आरसूळ मॅडम ,नागरगोजे मॅडम



व गावातील ग्रामस्थ उपस्थित होते. वकृत्व स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थिनीने जास्तीत जास्त स्पर्धेमध्ये भाग घेतला होता. एकूण ४१ मुला मुलींचे भाषणे झाली. व त्याचे बक्षीस वितरण १५ जानेवारी रोजी होणार आहे असे कळविण्यात आले.या कार्यक्रमाचे संचलन जोगदंड सर यांनी केले. व कार्यक्रमाचे प्रास्ताविक टेकाळे सर यांनी केले शेवटी सर्वांचे आभार खाडे सर यांनी मानले.

# मराठी भाषेमुळे आज सामाजिक व सांस्कृतिक विकास झाला-डॉ.ऋषिकेश कांबळे

दैनिक वादळ वार्ता

**पाचोड । प्रतिनिधी**

दि. १३रोजी शिवछत्रपती कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय पाचोड येथे मराठी विभागाच्या वतीने 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' उद्घाटन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला ज्येष्ठ विचारवंत लेखक, समीक्षक तथा प्राचार्य डॉ. ऋषिकेश कांबळे हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते कार्यक्रमाचे अध्यक्षीय स्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे यांनी भूषविले

यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. ऋषिकेश कांबळे म्हणाले की, मराठी भाषा जतन व संवर्धन करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. भाषा ही समाजाला जोडत असते कोणतीही भाषा तेव्हाच जिवंत राहते जेव्हा ती प्रभावीपणे वापरली जाते. आज मराठी भाषेमध्ये करिअरच्या विविध संधी उपलब्ध असून विद्यार्थ्यांनी त्याचा लाभ घ्यावा, असे त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे यांनी सांगितले की, मराठी भाषेला नुकताच अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाला आहे. त्यामुळे मराठी भाषा आता भारतातील




विविध विद्यापीठांमध्ये शिकली व शिकवली जाणार आहे. भाषा हे समाज व्यवहाराचे प्रभावी माध्यम असून मराठी भाषेचा अभिमान बाळगणे आवश्यक आहे

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. संतोष चव्हाण यांनी करून कार्यक्रमाचा उद्देश व हेतू स्पष्ट केला. सूत्रसंचालन प्रा.विनोद कांबळे यांनी केले तर आभार डॉ. हरिप्रसाद बिडवे यांनी मानले याप्रसंगी महाविद्यालयातील डॉ.सुरेश नलावडे डॉ. सुभाष पोटभरे डॉ.गांधी बानायत डॉ. विलास महाजन डॉ.तुकाराम गावंडे डॉ. हेमंत कुमार जैन डॉ. उत्तम जाधव डॉ.विठ्ठल देखणे प्रा.नितीन चित्ते प्रा.अरुणा दसपुते आदी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर राज्यस्तरीय पुरस्कारासाठी बाळासाहेब पांडे यांची निवड



दैनिक वादळ वार्ता

**नायगाव । प्रतिनिधी**

मराठी पत्रकारितेचे जनक दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ दिला जाणारा राज्यस्तरीय 'दर्पण बाळशास्त्री जांभेकर पुरस्कार' जेष्ठ पत्रकार डी. मा. बाळासाहेब पांडे यांना जाहीर झाला आहे. ग्रामीण प्रश्न, सामाजिक अन्यायाविरोधातील निर्भीड लेखन आणि जनसामान्यांच्या बाजूने उभे राहणारी पत्रकारिता यासाठी त्यांच्या कार्याची दखल घेण्यात आली आहे.

सप्तरंगी साहित्य मंडळ महाराष्ट्र राज्य व मुकनायक वाचनालय मांजरम यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय जनसंवाद ग्रामीण साहित्य संमेलन येत्या २२ फेब्रुवारी २०२६ रोजी मांजरम (ता. नायगाव, जि. नांदेड) येथे होणार असून, या संमेलनात मान्यवरांच्या हस्ते पांडे यांना हा पुरस्कार प्रदान केला जाणार आहे.

या निवडीबद्दल नायगाव व्हॉईस ऑफ मिडियाच्या वतीने दर्पण दिनी उपविभागीय पोलिस उपअधीक्षक श्याम पानेगावकर यांच्या हस्ते पांडे यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी पत्रकार, साहित्यिक व विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. या सन्मानामुळे ग्रामीण पत्रकारितेचा गौरव उंचावल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

## पुस्तकाचा गंध मस्तकात रुजला की माणूस घडतो–प्रा.डॉ.प्रल्हाद लुलेकर

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामविस्तार दिनानिमित्त तुलसी महाविद्यालयात व्याख्यान

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव मराठवाडा विद्यापीठाला लाभल्यानंतर या विद्यापीठाचा दर्जा ज्ञानाने समृद्ध करणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. ज्ञानाची श्रीमंती वाढली, पुस्तकाचा गंध मस्तकात रुजला की माणूस घडतो, असे प्रतिपादन प्रसिद्ध विचारवंत व साहित्यिक प्रा.डॉ. प्रल्हाद लुलेकर यांनी केले.डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नामविस्तार दिनानिमित्त बुधवार (दि. १४) रोजी तुलसी शैक्षणिक समूह, बीड यांच्या वतीने आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. हा कार्यक्रम तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय, बीड येथे पार पडला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नालंदा फाउंडेशन, बीडचे अध्यक्ष मा.प्रा.प्रदीप रोडे होते. प्रमुख अतिथी म्हणून प्रियदर्शी बहुजनवादी स्पर्धा परीक्षा केंद्राचे अध्यक्ष प्रा.अशोक गायकवाड तसेच जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे उपायुक्त मा.उमेश सोनवणे उपस्थित होते.डॉ. लुलेकर यांनी मराठवाड्याचा ऐतिहासिक, सामाजिक व शैक्षणिक प्रवास उलगडून सांगताना नमूद केले की, मराठवाडा हा दीर्घकाळ गुलामीत राहिलेला प्रदेश असून निजामशाहीच्या काळात शिक्षणाची मोठी पीछेहाट झाली. १९५८ मध्ये मराठवाडा विद्यापीठाची स्थापना झाल्यानंतरच या भागात उच्च शिक्षणाची खरी सुरुवात झाली.फुले-शाहू-आंबेडकर आणि शिवाजी महाराजांचा महाराष्ट्र आजही जातीवादातून मुक्त नसल्यामुळे विद्यापीठाच्या नामांतराला सतरा वर्षे विरोध झाला. अखेर १४ जानेवारी १९९४ रोजी नामांतर झाले. बाबासाहेबांचे नाव मिळाल्यानंतर विद्यापीठाचा दर्जा उंचावण्याची जबाबदारी शिक्षक, विद्यार्थी आणि समाजावर असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

विद्यापीठातील अनेक विभागांमध्ये विद्यार्थी प्रवेश कमी होत असल्याबाबत चिंता व्यक्त करताना डॉ. लुलेकर म्हणाले की, शिक्षणाशिवाय समाजाच्या प्रगतीला कोणताही पर्याय नाही. केवळ पदव्या नव्हे तर मुळातून ज्ञानसमृद्ध व्हावे लागते. समाजाने आपली मुले महाविद्यालये व विद्यापीठांत शिक्षणासाठी पाठवावे, असे आवाहन त्यांनी केले.

प्रमुख पाहुणे उमेश सोनवणे यांनी शेक्सपियरच्या उदाहरणातून सांगितले की, गुलाबाला कोणतेही नाव दिले तरी त्याचा सुगंध कमी होत नाही. विद्यापीठाचा नामविस्तार हा केवळ नावाचा प्रश्न नसून तो आत्मसन्मान व स्वाभिमानाची लढाई असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.अध्यक्षीय भाषणात प्रा. प्रदीप रोडे यांनी सांगितले की, ज्ञान हे आयुष्यभर उपयोगी पडते. ते मिळवण्यासाठी वाचन आवश्यक आहे. शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी वाचन केले, तर त्यांना वेगळे सांगावे लागणार नाही. ज्ञानाची आवड निर्माण व्हावी, यासाठी अशा कार्यक्रमांचे आयोजन केले जाते, असे नमूद केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. विकास वाघमारे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ.योगिता लांडगे यांनी, तर आभार प्रदर्शन प्रा.किशोर वाघमारे यांनी मानले. कार्यक्रमास संस्थेच्या विविध शाळा व महाविद्यालयांचे प्राचार्य, शिक्षकवृंद, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खबरदार नायलॉन मांजाची विक्री किंवा साठा कराल तर पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांची सक्त सूचना

## केज पोलिसांची मांजा विक्रेत्यांसाठी सूचना

दैनिक वादळ वार्ता
**गौतम बचुटे । केज**

केज पोलिसांनी शहरातील नायलॉन मांजा विक्री आणि साठा करून ठेवणाऱ्या विरुद्ध केज पोलिसांनी कठोर कारवाईचे संकेत दिले आहेत.

नायलॉन मांजामुळे होणारे अपघात यामुळे केज पोलिसांनी या विरुद्ध कठोर पावले उचलली आहेत तसेच नायलॉन मांजा आणि त्याच्या साठ्या संदर्भात मा. उच्च न्यायालयाच्या आदेशा नुसार कोणीही नायलॉन मांजाची विक्री, साठवणूक अथवा वापर करु नये असे आदेश असल्याने त्या संदर्भात केज पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांनी अशा प्रकारे कायद्याचे व मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या नायलॉन मांजा विक्रेत्यांना सक्त ताकीद दिली आहे. जर कोणी नियमांचे उल्लंघन करून अशा प्रकारे नायलॉन मांजा विक्री किंवा साठा करून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याच्यावर कायद्या नुसार कठोर कारवाई करण्यात येईल. असा इशारा दिला आहे. तसेच केज पोलिस ठाण्याच्या हद्दीत कुठेही नायलॉन मांजाचा साठा किंवा विक्री, व्यापार होत असल्याचे आढळून आल्यास, नागरिकांनी तात्काळ पोलिसांना माहिती देण्याचे आवाहन पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांनी केले आहे.



# बीड पालिकेच्या उपनगर अध्यक्षपदी विनोद मुळूक

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

बीडचे आ.संदीप क्षीरसागर यांच्या गटाने अजित पवार गटाचे उमेदवार विनोद मुळूक यांना नगर परिषद उपाध्यक्ष पदासाठी बिनविरोध पाठिंबा दिला. त्यामुळे मुळूक यांची उपाध्यक्षपदी निवड झाली. क्षीरसागर मुक्तीचा नारा देणाऱ्या पंडिताना शेवटी एका क्षीरसागरची मदत घ्यावीच लागल्याचे दिसून आले.

बीड नगर परिषद निवडणुकीत अजित पवार गटाचा नगराध्यक्ष आणि १९ नगरसेवक निवडून आले होते. शिवसेनेचे तीन नगरसेवक आणि काँग्रेस, एमआयएम ने पाठिंबा दिल्याने त्यांची संख्या २५ झाली होती. मात्र बहुमतासाठी आ. संदीप क्षीरसागर यांची मदत आवश्यक होती. आ क्षीरसागर कोणाला पाठिंबा देणार याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. निवडणूक निकालानंतर आ विजयसिंह पंडित यांनी बीड क्षीरसागर मुक्त झाल्याची प्रतिक्रिया दिली होती. मात्र उपाध्यक्ष पदासाठी त्यांना आ संदीप क्षीरसागर यांचा पाठिंबा घ्यावा लागला आहे.

आ. संदीप क्षीरसागर यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी चर्चा झाल्यानंतर बीडमध्ये पाठिंब्याचे पत्र दिले. भाजपकडून डॉ.सारिका क्षीरसागर यांनी अर्ज दाखल केला होता. उपाध्यक्ष निवडीची प्रक्रिया सुरु झाल्यानंतर दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसचे मताधिक्य अधिक असल्याने उपाध्यक्ष म्हणून विनोद मुळूक यांची निवड झाली.



# नंदुरबार तहसील कार्यालयाकडून जप्त वाहनांचा जाहीर लिलाव; २१ जानेवारीला होणार प्रक्रिया

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

नंदुरबार तालुक्यात अवैध गौण खनिज उत्खनन आणि वाहतुकीवर प्रशासनाने कठोर पाऊल उचलले आहे. अनधिकृत वाहतूक करताना जप्त करण्यात आलेल्या आणि दंडाची रक्कम न भरलेल्या तीन मोठ्या वाहनांचा जाहीर लिलाव येत्या २१ जानेवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आला आहे. नंदुरबारचे तहसीलदार प्रदीप पवार यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे ही माहिती दिली.

नंदुरबार महसूल विभागाने गेल्या काही काळात अवैध वाळू आणि इतर गौण खनिजांच्या वाहतुकीवर छापे टाकून अनेक वाहने जप्त केली होती. यामधील संबंधित वाहन मालकांना प्रशासनाकडून दंडात्मक नोटिसा बजावण्यात आल्या होत्या व दंडाची रक्कम भरण्याचे आदेश दिले होते. मात्र, वारंवार सूचना देऊनही वाहन धारकांनी दंडाचा भरणा केला नाही. परिणामी, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील तरतुदींनुसार, हा दंड जमीन महसुलाची थकबाकी समजून वाहने लिलावात काढण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी नंदुरबार यांनी या वाहनांची तांत्रिक स्थिती पाहून त्यांचे शासकीय मूल्यांकन निश्चित केले आहे. लिलावाची सुरुवात खालील किमतींपासून होईल:

ट्रक (MH-20-GC-3594): मूल्यांकन ४४ लाख ४१ हजार रुपये.

गउइ (MH-41-T-1540): मूल्यांकन ११ लाख ५० हजार रुपये.

डंपर (MH-15-JC-6799): मूल्यांकन ४५ लाख रुपये. हा लिलाव बुधवार, २१ जानेवारी २०२६ रोजी दुपारी १२:०० वाजता तहसील कार्यालय, नंदुरबार च्या प्रांगणात पार पडणार आहे. या लिलाव प्रक्रियेमध्ये पारदर्शकता राखली जाणार असून, नंदुरबार तालुक्यातील तसेच बाहेरील जास्तीत जास्त इच्छुक नागरिकांनी या प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे आवाहन तहसीलदार प्रदीप पवार यांनी केले आहे. लिलावाच्या अटी व शर्ती संदर्भात अधिक माहिती लिलावापूर्वी तहसील कार्यालयात उपलब्ध करून दिली जाईल. प्रशासनाच्या या आक्रमक भूमिकेमुळे अवैध गौण खनिज माफियांचे धाबे दणाणले असून, सरकारी महसूल वसुलीसाठी हा एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

# लोह्यात श्रामणेर संघास फलहार वाटप

दैनिक वादळ वार्ता
**लोहा । प्रतिनिधी**

लोह्यात क्रांतीसुर्य बुध्द विहारात श्रामणेर संघास दि.११ जानेवारी रोजी सावळे, सोनकांबळे, कांबळे परीवारांच्या वतीने फलाहार वाटप करण्यात आले.

बौद्ध धम्माचा प्रचार व प्रसार होण्यासाठी भारतीय बौद्ध महासभा शाखा लोहा च्या वतीने लोहा येथील क्रांतीसुर्य बुधदविहारात १० दिवसीय श्रामणेर व बौध्दाचार्य शिबीराचे आयोजन दि. ७-१-२०२६ ते १६-१-२०२६ दरम्यान करण्यात आले.



सदरील श्रामणेर शिबीरास मोठा प्रतिसाद मिळाला असुन ३१ युवक हे श्रामणेर झाले आहेत. सदरील श्रामणेर संघास अनेक धम्म बांधव दायक हे धम्मदान, चहा, नाष्टा , भोजन, फलाहार देत आहेत. सबका मंगल होवो या जयघोषाने लोहा शहरात बौद्धमय वातावरण निर्माण झाले आहे. दि. १४-१-२०२६ रोज बुधवारी सायंकाळी ७.३० वाजता पत्रकार विलास सावळे यांची कन्या कु. वंशिका विलास सावळे , सहशिक्षक धनंजय सोनकांबळे यांची पत्नी ग्रामसेविका सौ. गोदावरी धनंजय सोनकांबळे व दिगांबर कांबळे आदींच्या वतीने फलाहार वाटप करण्यात आले. यावेळी प्रथम तथागत गौतम बुद्ध व भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार विश्वरत्न परमपूज्य बोधीसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुर्तीस पत्रकार विलास सावळे,सौ. छाया विलास सावळे,कु. वंशिका विलास सावळे, सहशिक्षक धनंजय कांबळे, ग्रामसेविका सौ. गोदावरी धनंजय सोनकांबळे, दिगाबंर कांबळे व त्यांच्या पत्नी यांच्या हस्ते पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

त्यानंतर पुज्य भंदत यांनी सामुदायिकरित्या त्रिशरण पंचशील व बुद्ध वंदना घेण्यात आली. यावेळी केंद्रीय शिक्षक डी. आय. खेडकर,केंद्रीय शिक्षक तथा भारतीय बौद्ध महासभेचे लोहा तालुकाध्यक्ष बापुसाहेब कापुरे, केंद्रीय शिक्षक धोंडीबा यानभूरे, माजी नगरसेवक उत्तम महाबळे, शरद कापुरे, सिध्दार्थ महाबळे,समता सैनिक दलाचे सचिव सिध्दार्थ ससाणे , विनोद महाबळे, भीमराव गोडबोले,सौ. प्रतिभा भीमराव गोडबोले, सुशांत गोडबोले,यांच्यासह मोठ्या संख्येने उपासक उपासिका उपस्थित होते.

# घरकुल हप्त्यांवर प्रशासनाची दिरंगाई–दलित पँथरचा २६ जानेवारीला 'शोले स्टाईल' आंदोलनाचा इशारा

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

गरिबांच्या हक्काच्या घरकुल योजनेचा बोजवारा उडवणाऱ्या नगरपरिषद प्रशासनाविरोधात आता थेट रस्त्यावर उतरून लढा उभारण्याचा इशारा दलित पँथर संघटनेने दिला आहे.सन २०२३-२४ व २०२४-२५ या कालावधीतील घरकुल योजनेचे हप्ते अद्याप लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा न झाल्याने शेकडो कुटुंबांचे संसार उघड्यावर आले आहेत.महागाई, मजुरीचे वाढते दर आणि साहित्य खर्चामुळे आधीच कर्जबाजारी झालेल्या लाभार्थ्यांना प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे जीव मुठीत धरून राहावे लागत आहे. अनेक घरकुलांची कामे अर्धवट अवस्थेत असून, काही कुटुंबे आजही धोकादायक व असुरक्षित घरांमध्ये राहण्यास मजबूर आहेत.प्रशासनाला वारंवार निवेदने, तक्रारी व विनंत्या करूनही केवळ आश्वासनांची



पोकळी मिळत आहे. योजना अस्तित्वात आहे, निधी मंजूर आहे, मात्र हप्ते खात्यावर जमा होत नाहीत – हा प्रशासनाचा उघड बेजबाबदारपणा असल्याचा आरोप दलित पँथरने केला आहे.

यासंदर्भात नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देत धम्मानंद वाघमारे (जिल्हाध्यक्ष, दलित पँथर बीड) यांनी स्पष्ट शब्दांत इशारा दिला आहे की,तत्काळ सर्व प्रलंबित घरकुल हप्ते जमा करण्यात यावेत,अन्यथा दि. २६ जानेवारी २०२६ रोजी नगरपरिषद कार्यालयासमोर शोले स्टाईल तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.या आंदोलनामुळे निर्माण होणाऱ्या कायदा-सुव्यवस्थेच्या परिस्थितीस संपूर्ण नगरपरिषद प्रशासन जबाबदार राहील, असा थेट इशाराही देण्यात आला आहे.

प्रशासनाने वेळेत निर्णय घेतला नाही, तर हा लढा अधिक तीव्र केला जाईल, आणि गरिबांचा हक्क मिळेपर्यंत दलित पँथर गप्प बसणार नाही, असा ठाम निर्धार व्यक्त करण्यात आला आहे.

यावेळी उपस्थित प्रेम कांबळे, आकाश वाघमारे,वीशाल जाधव, अरविंद ईनकर इत्यादी होते.

# नंदुरबारच्या वैद्यकीय महाविद्यालयाचे काम वेळेत पूर्ण करा; उपविभागीय अधिकारी अंजली शर्मा यांचे निर्देश

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

नंदुरबार जिल्ह्याच्या आरोग्य क्रांतीचे केंद्र ठरू पाहणाऱ्या नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या इमारतीचे काम आता अंतिम टप्प्यात येत आहे. या कामाच्या प्रगतीची पाहणी करण्यासाठी उपविभागीय अधिकारी अंजली शर्मा यांनी आज प्रत्यक्ष बांधकाम स्थळाला भेट देऊन सविस्तर आढावा घेतला. भेटीदरम्यान शर्मा यांनी महाविद्यालयाच्या प्रशासकीय इमारतीसह, विविध विभागांची रचना , प्रयोगशाळा आणि प्रस्तावित रुग्णालय कक्षांची पाहणी केली. यावेळी उपस्थित सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंते आणि संबंधित अधिकाऱ्यांकडून त्यांनी कामाच्या तांत्रिक बाबी समजून घेतल्या. केवळ इमारत उभी करणे महत्त्वाचे नसून, ती वैद्यकीय शिक्षणाच्या मानकांनुसार दर्जेदार असणे आवश्यक असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.



प्रशासनाकडून महत्त्वाच्या सूचना:-

पाहणी दरम्यान अंजली शर्मा यांनी खालील बाबींवर विशेष भर दिला.पायाभूत सुविधांचे काम करताना दर्जाबाबत कोणतीही तडजोड करू नये.उर्वरित सर्व कामे ठरलेल्या कालमर्यादेत पूर्ण करावीत, जेणेकरून शैक्षणिक सत्र वेळेवर सुरू करता येईल.रुग्णसेवा आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन अत्याधुनिक सोयीसुविधा सज्ज ठेवण्याचे निर्देश त्यांनी दिले.

नंदुरबार जिल्हा हा आदिवासी बहुल आणि दुर्गम जिल्हा म्हणून ओळखला जातो. या ठिकाणी वैद्यकीय महाविद्यालय सुरू झाल्यामुळे स्थानिक विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षणाची संधी तर मिळेलच, शिवाय जिल्ह्यातील नागरिकांना उपचारासाठी गुजरात किंवा इतर मोठ्या शहरांकडे धाव घ्यावी लागणार नाही. भविष्यात हे महाविद्यालय जिल्ह्याच्या आरोग्याचा कणा ठरणार आहे. यावेळी विविध विभागांचे अधिकारी, अभियंते आणि कर्मचारी उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077